**निशाण क्र. ५८ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कागदपत्र दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. सबब सदर कागदपत्रे दाखल करणेस परवानगी मिळावी, अशी प्रस्तूत प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार सदरचे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सादर केलेले कागदपत्र हे खोटे, खोडसाळ व अप्रामाणिक हेतूचे असून ते दाखल करून घेण्यात येवू नयेत. सबब सदरील अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १, २ व वादी यांचे तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर कागदपत्र हे वाद विषयाशी संबंधित आहेत असे दिसून येते. सदरचा दावा हा वाटप, पृथक कब्जा व मनाईकरीता आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना हे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्या सारखे होईल असे वाटते. परिणामी त्यांचे कशानेही भरून न येणारे अपरिमित नुकसान होईल असे वाटते. याउलट अशी परवानगी मंजूर केल्यास वादीचे कसलेही नुकसान होईल असे वाटत नाही. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वाद विषयाचे गुणावगुणावर निवारण होण्यास

मदतच होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस क्रमप्राप्त आहे असे वाटते. परिणामी खालील आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक : १२/०३/२०२०

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2020.03.13 11:01:20 +0530